लोकमत

# रवळनाथ सोसायटीकडून आर्थिक मदत

## पंडित कुटुंबाला दिला आधार : आगीत घर जळून नुकसान

लोकमत न्यूज नेटवर्क

कुडाळ : पावशी मिटक्याचीवाडी येथील हेमंत पंडित यांच्या घराला आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यांना कुडाळ येथील रवळनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीने तत्काळ आर्थिक मदत करीत सामाजिक बांधिलकी जोपासली. गेल्या सहा महिन्यांपासून श्री रवळनाथने सिंधुदुर्गातील गरजूंशी मदतीच्या माध्यमातून ऋणानुबंध जोडले आहेत.

पावशी मिटक्याचीवाडी येथील हेमंत पंडित यांच्या घराला मंगळवारी अचानक आग लागून घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घरासह जीवनावश्यक साहित्य, दागिने, कपडे, पैसे आदी मिळून सुमारे १० लाखांचे नुकसान झाले आहे. अर्धा ते एक तास आग धुमसत असताना ग्रामस्थांनी चांगले सहकार्य केले

कुडाळमधील अग्निशमन दलाच्या बंबाने आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र, घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने पंडित कुटुंबीयांचा संसार उद्ध्वस्त झाला.

पंडित कुटुंबीयांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. घरातील जी खोली होती त्यामध्ये दागिने, कपडे, जीवनावश्यक साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे आदी सर्वच साहित्य असल्याने हे सर्व साहित्य जळून खाक झाले.



मिटक्याचीवाडी येथे आग लागून घर जळालेल्या पंडित कुटुंबीयांना रवळनाथ हौसिंगच्यावतीने आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, राजेंद्र केसरकर, मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर उपस्थित होते.

### सामाजिक बांधिलकी जोपासत तत्काळ मदत

- संपूर्ण घरच जळून खाक झाल्याने पंडित कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सहा महिन्यांपूर्वी मुहूर्तमेढ रोवलेल्या व सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या रवळनाथ को- ऑपरेटीव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांना याबाबत समजताच त्यांनी बुधवारी सकाळी पंडित यांच्या घरी धाव घेत तत्काळ १५ हजारांची मदत केली. यावेळी संचालक मनोहर गुरबे, उद्योजक राजेंद्र केसरकर, प्रभारी शाखाधिकारी विक्रम जांभेकर, नितीन पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी एम. एल. चौगुले यांनी सांगितले की, संकट आल्यानंतर त्या संकटाला पंडित कुटुंबाने धैर्याने तोंड दिले आहे. आज आम्ही रवळनाथच्या माध्यमातून तत्काळ मदत दिली. भविष्यातही आम्ही मदतीचा हात देऊ. मुळात रवळनाथ को-ऑपरेटीव्ह हौसिंग फायनान्स ही घरांसाठी कर्ज देणारी असल्याने आम्ही आज या कुटुंबाला तत्काळ मदत देत असल्याचे सांगत पंडित कुटुंबीयांना त्यांनी धीर दिला.

पुढारी

संक्षिप्त



पावशी :घर जळालेल्या पंडित कुटुंबाला श्री खळनाथच्या वतीने आर्थिक मदत देताना अध्यक्ष एम. एल. चौगुले व अन्य.

# पावशीतील बेचिराख घर मालकाला खळनाथकडून मदत

कुडाळ (पुढारी वृत्तसेवा) : कुडाळ तालुक्यातील पावशी-मिटक्याचीवाडी येथील हेमंत पंडित यांच्या घराला मंगळवारी आग लागून घर पूर्णत: बेचिराख झाले होते. या घटनेची दखल घेत खळनाथ को ऑप हौसिंग फायनान्स सोसा.ने पंडित कुटुंबियांना सामाजिक बांधिलकी जोपासत मदतीचा हात दिला.सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक मनोहर गुरबे, उद्योजक राजेंद्र केसरकर, प्रभारी शाखाधिकारी विक्रम जांभेकर, नितीन पाटील आदी उपस्थित होते.